स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखेअंतर्गत 'इतिहास' विषयातील पीएच्.डी.पदवीकरिता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

"स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती : एक ऐतिहासिक अभ्यास"(इ.स.१९४८ ते इ.स.२००४)

संशोधक

अंभोरे नारायण दिगंबरराव

एम.ए., बी.एड्., एम.फिल्.(इतिहास),

नांदेड

मार्गदर्शक

प्रा.डॉ.काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण

एम.ए., पीएच्.डी.

सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक

इतिहास विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत, जि.हिंगोली

संशोधन केंद्र

नुतन महाविद्यालय, सेलू, जि.परभणी

ऑगस्ट २०२१

"स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती : एक ऐतिहासिक अभ्यास" (इ.स.१९४८ ते इ.स.२००४)

प्रस्तावना :-

देशाचे भवितव्य हे देशातील शिक्षण प्रक्रियेवर अवलंबून असते. म्हणूनच जगातील अनेक विचारवंतांनी आपल्या विचारामध्ये स्पष्ट केले आहे की, एखाद्या राष्ट्राचे भविष्य पाहावयाचे असेल तर त्या राष्ट्रातील शैक्षणिक परिस्थितीचा इतिहास अभ्यासला पाहिजे. भारतामध्ये प्रारंभिक शिक्षणाचा केंद्रबिंदू म्हणजे सिंधु संस्कृती होय. ही सिंधु संस्कृती पुढारलेली असली तरी तत्कालीन शिक्षणाविषयी निश्चित माहिती उपलब्ध होत नाही. या संस्कृतीला लेखनकला अवगत होती अशी माहिती मिळते, मात्र ती लिपी आजपर्यंत वाचता आली नाही.

शिक्षणाच्या दृष्टीने वैदिक काळ हा चांगला व समृद्ध होता. या काळात शिक्षणाला महत्त्व दिले गेले. "मानवाला स्वावलंबी व निःस्वार्थी बनवते तीच खरी विद्या" असे वर्णन ऋग्वेदामध्ये आढळून येते. उत्तर वैदिक काळात आश्रमव्यवस्था निर्माण झाली व शिक्षणाचा व्यक्तीच्या जीवनात कालखंड ठरविला गेला. त्यास ब्रह्मचर्याश्रम असे नाव दिले गेले. हा विद्यार्जनाचा काळ होता. यामध्ये वेद, ब्रह्मविद्या, मिमांसा, राजनिती, इतिहास, खगोल, ज्योतिष, चिकित्सा, धनुर्विद्या अशा शास्त्राचे शिक्षण मिळत होते. विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक उन्नतीकडे लक्ष दिले गेले होते.

बौद्ध व जैन कालखंडातसुद्धा शिक्षणाचा विकास झाला. भारतात सर्वात प्राचीन विद्यापीठ असलेल्या तक्षशिला विद्यापीठातून इतिहास, व्याकरण, अर्थशास्त्र, नितीशास्त्र, औद्योगिक व वैद्यकीय शिक्षण दिले जात होते. याशिवाय पाटलीपुत्र, राजगृह, काशी, वल्लभी ही तत्कालीन शैक्षणिक केंद्रे होती. गुप्तकाळात नालंदा विद्यापीठाचा उदय झाला. तत्कालीन

शिक्षणाने जीवनाच्या सर्वच अंगाला कसे विकसित केले होते याचे गुप्तकाळ उत्कृष्ट उदाहरण आहे. गुप्तकाळात उज्जैयनी, अयोध्या, मथुरा, कांची, वल्लभी ही शैक्षणिक केंद्रे भरभराटीला आली. दक्षिण भारतात वाकाटकांची राजधानी असलेले वत्सगुल्म शिक्षणाचे मोठे केंद्र बनले. हर्षवर्धनकाळात शिक्षणक्षेत्रात आणखी प्रगती झाली. या काळात नालंदा विद्यापीठामध्ये दहा हजार विद्यार्थी व पंधराशे दहा शिक्षक होते. गणित, इतिहास, व्याकरण, खगोलशास्त्र, ज्योतिष, तर्कशास्त्र, इत्यादी विषयाचे शिक्षण तेथे दिले जात होते. नालंदा विद्यापीठाच्या खालोखाल विक्रमशिला विद्यापीठ महत्त्वाचे होते. दक्षिण भारतात ही प्रतिष्ठाण (पैठण), मदुरा, कांची, वातापी (बदामी) इत्यादी शिक्षणाची केंद्रे होती. एकुणच प्राचीन भारतामध्ये शिक्षण विकासाला गती आली होती. पुढे मुस्लिम आक्रमणाच्या काळात नालंदा विद्यापीठ उध्वस्त झाले.

मध्ययुगामध्ये सुलतानशाही व मोगल कालखंडात शिक्षणाच्या दृष्टीने फारसे कार्य झाल्याचे दिसत नाही. या कालखंडात धर्माला अधिक महत्त्व आल्यामुळे धार्मिक स्वरूपाचेच शिक्षण मुस्लिमांना दिले जात होते. साधारणतः प्रत्येक मशिदीला जोडून मदरसा असे आणि तेथे मुस्लिम मुलांना कुराण, शरियत यांचे शिक्षण देण्याचे कार्य मौलवी करीत होते. सुलतानशाहीत शिक्षणाबद्दल आस्था असणारा सुलतान म्हणजे महमंद तुघलक होय. इतिहासकारांनी महंमद तुघलकाला 'मध्ययुगाचा ॲरिस्टॉटल' म्हटले आहे. परंतु स्वतः विख्यात असलेल्या महमंद तुघलकाने शिक्षणाला फार मोठा आश्रय दिल्याचे दिसत नाही. सुलतान फिरोजशहाच्या काळात अनेक पाठशाळा व महाविद्यालये सुरू झाली. फेरिस्ताच्या म्हणण्यानुसार, फिरोजने तीस महाविद्यालये बांधली होती. बहामनी राज्यातील महंमद गवान याने बिदर येथे एक महाविद्यालय सुरू करून शिक्षणाला चालना दिली होती. मोगल कालखंडात सम्राट अकबराने शिक्षण कार्यात विशेष रूची घेतली होती. अकबराने आग्रा, शिक्री, फत्तेपूर, गुजरात इत्यादी ठिकाणी शिक्षणाची नवीन केंद्रे सुरू केली व शिक्षणाला प्रोत्साहन देऊन शैक्षणिक प्रगती साधण्याचा प्रयत्न केला. औरंगजेबाच्या कालखंडात ही परिस्थिती बदलली. औरंगजेबाने हिंदु लोकांवर निर्बंध लावले. तरी देखील औरंगजेबाच्या काळात विविध विषयांचे अध्ययन केले जात होते. हिंदुमध्ये शिक्षणाचे कार्य ब्राह्मणवर्ग करत

होता. मंदिरात पाठशाळा भरत व तेथे अध्ययन-अध्यापनाचे कार्य चालत होते. उपनिषद, रामायण, महाभारत यांची माहिती देण्यासोबत गणित, तर्क, ज्योतिष इत्यादी विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले जाई. एकंदरीत या मुस्लिम राजवटीमध्ये राजकीय अस्थिरतेमुळे शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती होवू शकली नाही पण जीवनावश्यक बाब म्हणून वाचन, लेखन व व्यवहार उपयोगी ज्ञान दिले जात होते.

१९ व्या शतकात आधुनिक शिक्षणाचा भारतात झालेला विकास हा राष्ट्राच्या पुनःरुत्थानाला मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरला. ब्रिटिशकालीन शिक्षण पद्धतीमुळे भारतातील शिक्षण विषयक धोरणाला नवी दिशा मिळाली. त्यातून भारतात आधुनिक शिक्षणाचा पाया घातला गेला. शिक्षणाची दारे सर्व वर्गांसाठी खुली झाली. पाश्चात्त्य शिक्षणामुळे भारतात आधुनिक विचार रूजु लागले. युरोपातील प्रबोधन व क्रांती यांची ओळख भारतीयांना होवू लागली. राजा राममोहन रॉय, महात्मा फुले यांच्यासारख्या विद्वानांनी शिक्षणाच्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणले. भारतात झालेल्या या शैक्षणिक क्रांतीमुळे अखेर ब्रिटिशांच्या गुलामीतून भारत मुक्त झाला.

ब्रिटिशांच्या आगमनानंतर भारतात सर्वत्र शिक्षणाचा विकास होत होता. पाश्चात्त्य ज्ञान, तत्त्वज्ञान यांची ओळख भारतीयांना झाली होती. युरोपात घडून आलेले प्रबोधन, स्वातंत्र्य व हक्कासाठी झालेल्या क्रांत्या यांच्या अभ्यासातून भारतात नव्या युगाला सुरूवात झाली होती.

परंतु, ब्रिटिशांच्या आश्रयाने स्वतंत्रपणे राज्य करणाऱ्या हैद्राबाद संस्थानामध्ये याचा गंध ही आला नव्हता. मोगल सम्राट औरंगजेबाच्या मृत्यूनंतर (इ.स. १७०७) निर्माण झालेल्या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन मीर कमरूद्दीन उर्फ निजाम-उल-मुल्क (चिनकुलीजखान, आसफजहाँ) याने दक्षिण भारतात हैद्राबाद (भागानगर) येथे इ.स. १७२४ मध्ये स्वतंत्र निजाम राज्याची स्थापना केली. इ.स. १७२४ ते इ.स. १९४८ पर्यंत हैद्राबाद संस्थानावर निजामाने राज्य केले. या राज्यात सर्वसामान्य जनतेस गुलामापेक्षाही निकृष्ठ जीवन जगावे लागत. कंधार तालुक्यातील प्रसिद्ध महसूल अधिकारी फरिद मिर्झा म्हणतात, "यह आझादी है, या दैवी

गुलामी" पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात, "हैद्राबाद संस्थान पूर्णपणे मागासलेले होते." या मागासलेल्या राज्यात सुशिक्षिताचे प्रमाण ही अत्यल्प होते. शिक्षणाच्या विकासासाठी कोणत्याही निजामाने प्रयत्न केले नाही. उलट शिक्षणाचे क्षेत्र मागासलेले ठेवून हैद्राबाद संस्थानातील जनतेवर अन्याय केला. उर्दू ही सरकार दरबाराची भाषा असल्यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात उर्दू भाषेलाच महत्त्व दिले. इ.स. १९१७ च्या आदेशानुसार राज्यात उर्दू भाषा सर्वच ठिकाणी सक्तीची करण्यात आली. मराठवाड्यात केवळ नांदेड, परभणी, लातूर, बीड, औरंगाबाद, जालना येथे सरकारी हायस्कुल होते. संस्थानामध्ये शाळेत जाणाऱ्या हिंदु, मुस्लिम, विद्यार्थ्यांच्या संख्येच्या प्रमाणावरून निजामाचे शैक्षणिक धोरण मुस्लिम धर्मियासाठी अनुकूल तर मुस्लिमेत्तरांसाठी प्रतिकूल असल्याचे दिसून येते.

इ.स.१९४८ साली हैद्राबाद संस्थानाचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण झाले व नांदेड जिल्हा निजामाच्या जुलमी राजवटीतून मुक्त झाला. स्वातंत्र्यानंतर नांदेड जिल्हा स्वतंत्र हैद्राबाद राज्याचा भाग बनला. पुढे इ.स.१९५६ मध्ये द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती झाली आणि मराठवाड्यासहीत नांदेड जिल्ह्याचे मुंबई राज्यात विलिनीकरण करण्यात आले. आणि १ मे १९६० ला स्वतंत्र महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर मराठवाड्याच्या शैक्षणिक विकासासाठी मोठे प्रयत्न करण्यात आले. त्यातूनच नांदेड जिल्ह्यामध्ये प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सोई निर्माण झाल्या. इ.स.१९८१ साली नांदेड जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण ४१.१८% झाले. तेच निजाम राजवटीत इ.स.१९४१ साली ६.१५% एवढे होते.

एकूणच स्वातंत्र्योत्तर काळात नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक परिस्थितीमध्ये आमुलाग्र बदल झाला याचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी शैक्षणिकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा असलेला "स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती : एक ऐतिहासिक अभ्यास"(इ.स.१९४८ ते इ.स.२००४) हा विषय पीएच्.डी.शोधप्रबंधासाठी निवडण्यात आला आहे.

विषयाची निवड :-

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये लोकशाही शासनाने शिक्षणाच्या प्रसारासाठी वेगवेगळ्या सुधारणा व कायदे केले. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले. त्यामुळे नांदेड जिल्ह्याचा शैक्षणिकदृष्ट्या विकास होऊ शकला. या दृष्टिकोनातून स्वातंत्र्योत्तर काळात नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती कशी होती हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

१. नांदेड जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

३. इ.स.१९४८ ते इ.स.१९८६ या काळातील नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

४. इ.स.१९८७ ते इ.स.२००४ या काळातील नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक परिस्थितीचा आढावा घेणे.

५. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितकृत्ये :-

१. नांदेड जिल्ह्याला फार मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी लाभली आहे.

२. स्वातंत्र्यपूर्व काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती मागासलेली होती.

३. हैद्राबाद संस्थानातील मुस्लीम राजवटीचा प्रभाव नांदेड जिल्ह्यावर पडला होता.

४. स्वातंत्र्यपूर्व काळात निजामाच्या शैक्षणिक धोरणामुळे नांदेड जिल्ह्याचे शैक्षणिक अध:पतन झाले होते.

५. स्वातंत्र्योततर काळात नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक परिस्थितीत मोठ्या सुधारणा झाल्या.

६. शासनाच्या वेगवेगळ्या धोरणामुळे व कायद्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण झाले. त्यामुळे नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती सुधारली.

७. स्वातंत्र्योत्तर काळात नांदेड जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण वाढले.

८. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या सर्व सोई नांदेड जिल्ह्यात उपलब्ध आहेत.

तथ्य संकलन :-

मानव्य विद्याशाखेत (सामाजिक शास्त्र) तथ्य संकलनाचे प्रमुख दोन प्रकार पडतात.

१) प्राथमिक स्त्रोत :-

यामध्ये ऐतिहासिक कागदपत्रे, सरकारी कागदपत्रे, प्रत्यक्ष भेटी यांचा समावेश होतो.

२) दुय्यम स्त्रोत :-

यामध्ये वर्तमानपत्रे, मासिके, वार्षिक अंक, संदर्भ ग्रंथ इत्यादींचा समावेश होतो.

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करताना प्राथमिक व दुय्यम दर्जाच्या साधनांचा वापर करण्यात येणार आहे.

संशोधनाचा कालावधी :-

स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी इ.स.१९४८ ते इ.स.२००४ हा काळ निश्चित करण्यात आला आहे.

संशोधन पद्धती :-

इतिहास हे एक मानव्य विद्याशाखा (सामाजिक शास्त्र) असून त्याच्या अभ्यासासाठी चार पद्धतीचा वापर केला जातो.

१. सर्वेक्षणात्मक संशोधन पद्धती

२. प्रश्नावली संशोधन पद्धती

३. प्रत्यक्ष मुलाखत संशोधन पद्धती

४. संदर्भ ग्रंथ संशोधन पद्धती

यापैकी प्रस्तुत शोधप्रबंधासाठी उपरोक्त सर्वच संशोधन पद्धतींचा वापर करण्यात येणार आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा :-

स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याच्या शैक्षणिक परिस्थितीवर आतापर्यंत कुठेही स्वतंत्रपणे लिखाण झालेले नाही. पण इ.स.१९४८ ते इ.स.२००४ या काळात नांदेड जिल्ह्यातील शिक्षण कसे होते याची माहिती महाराष्ट्र व मराठवाड्याच्या संदर्भातून लेखन केलेल्या संशोधन प्रबंधातून व काही ग्रंथातून थोड्याफार प्रमाणात मिळते. यामध्ये (१) गोगटे श्री.ब. यांचे "मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास" (२) चंद्रात्रे ललिता यांचे "स्वामी

रामानंद तीर्थ यांचे मराठवाड्यातील शैक्षणिक कार्य" (३) जोशी संदीप यांचे "निजामकालीन मराठवाड्याची शैक्षणिक परिस्थिती" (४) डोईफोडे सुधाकरराव यांचे "हिंदुस्थानातील संस्थांनाचे विलीनीकरण कसे झाले?" (५) दुनाखे डॉ.अरविंद यांचे "उदयोन्मुख भारतातील शिक्षण" (६) फडके य.दि. यांचे "विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड-१" (७) कोटुरवार संतोष यांचे "स्वातंत्र्योत्तर मराठवाड्यातील विद्यार्थी संघटनांच्या विधायक चळवळीचा अभ्यास" (८) गोगटे श्री.ब. यांचे "मराठवाड्यातील व्यावसायिक शिक्षण" (९) राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे "जीवन शिक्षण" नियतकालिक (मासिक) इत्यादी.

संशोधन विषयाची व्याप्ती व मर्यादा :-

स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती या संशोधन विषयाची व्याप्ती इ.स.१९४८ ते इ.स.२००४ पर्यंत मर्यादित असून या काळात नांदेड जिल्ह्यातील प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि उच्च शिक्षण कशाप्रकारचे होते याचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन विषयाचे महत्त्व :-

राष्ट्राच्या आर्थिक विकासात शिक्षणास अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. देशाची प्रगती त्या देशातील शिक्षण पातळीवर अवलंबून असते. म्हणूनच स्वातंत्र्योत्तर काळात भारताने उदयोन्मूख शिक्षण पद्धतीचा स्वीकार केला. स्वातंत्र्यपूर्व काळातील शिक्षणावरील सर्व बंधने नष्ट करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण केले गेले. याच काळात नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक परिस्थिती कशी होती हे अभ्यासण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषय निवडला आहे.

प्रकरण विभागणी :-

प्रकरण पहिले :- नांदेड जिल्ह्याची भौगोलिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये नांदेड जिल्ह्याची भौगोलिक पार्श्वभूमी व ऐतिहासिक पार्श्वभूमी यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यामध्ये नांदेड जिल्ह्याच्या सिमा, लोकसंख्या, नद्या, हवामान, पर्जन्यमान, जमीन, पिके, जंगले, उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक - व ऐतिहासिकदृष्ट्या प्राचीन ते आधुनिक काळापर्यंतची नांदेड जिल्ह्याची ऐतिहासिक परिस्थिती अभ्यासली जाणार आहे.

प्रकरण दुसरे :- स्वातंत्र्यपूर्व काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातील नांदेड जिल्ह्यातील शैक्षणिक परिस्थिती कशी होती याचा अभ्यास करण्यात येणार आहे. प्राचीन काळापासून ते इ.स.१९४८ पर्यंत म्हणजे निजाम सत्तेच्या अस्तापर्यंतच्या शैक्षणिक परिस्थितीचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे :- स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती (इ.स.१९४८ ते इ.स.१९८६)

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील (इ.स.१९४८ ते इ.स.१९८६) नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती कशी होती. याचा अभ्यास प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या संदर्भातून करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण चौथे</u> :- स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती (इ.स.१९८७ ते इ.स.२००४)

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्वातंत्र्योत्तर काळातील (इ.स.१९८७ ते इ.स.२००४) नांदेड जिल्ह्याची शैक्षणिक परिस्थिती कशी होती. याचा अभ्यास प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक व उच्च शिक्षणाच्या संदर्भातून करण्यात येणार आहे.

<u>प्रकरण पाचे</u> :- निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील प्रकरणांच्या अभ्यासातून निष्कर्ष काढले जातील.

टीप :- संशोधनाला जशी गती येईल तसे संशोधन आराखड्यात थोडाबहूत बदल संभवतो.

संदर्भसूची :-

१. "जीवन शिक्षण", राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, नियतकालिक (मासिक)

२. सामुद्रे डॉ.संध्या, "उदयोन्मूख भारतीय समाजातील शिक्षण", मंगेश प्रकाशन, नागपूर.

३. धनागरे डॉ.द.ना., "उच्च शिक्षण : ध्येयवादाकडून बाजारपेठेकडे", लोकवाङ्मयगृह, मुंबई.

४. कपाले अरविंद, "भारतीय समाज आणि शिक्षण", निराली प्रकाशन, पुणे.

५. सोनवणे डॉ.रंजना, "समकालीन भारतातील शिक्षण आणि लिंगभाव, विद्यालय व समाज", प्रशांत पब्लिकेशन, पुणे,

६. दुनाखे डॉ.अरविंद, "उदयोन्मूख भारतीय समाजातील शिक्षण", डायमंड पब्लिकेशन, पुणे.

७. पाटील डॉ.विनोद व्ही. "समकालीन भारतातील शिक्षण", अथर्व पब्लिकेशन, पुणे.

८. भालेराव अनंत, "हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा", मौज प्रकाशन, मुंबई.

९. कुलकर्णी भुजंगराव, "मराठवाड्याचा विकास अभ्यास व चिंतन", पद्मजा प्रकाशन, औरंगाबाद.

१०. देव प्रभाकर, "हैद्राबाद मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य सैनिकांच्या मौखिक नोंदी", प्रशासक कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

११. चंद्रात्रे (जोशी) ललीता, "स्वामी रामानंद तीर्थ यांचे मराठवाड्यातील शैक्षणिक कार्य", अप्रकाशित पीएच्.डी.प्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

१२. गोगटे श्री.ब., "मराठवाड्यातील प्राथमिक शिक्षणाचा अभ्यास", प्रकल्प अहवाल, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद.

१३. शिक्षणावर दृष्टिक्षेप : २०००-२००१, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

१५. गोगटे श्री.ब., मराठवाड्यातील व्यावसायिक शिक्षण, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, पुणे.

१६. वार्षिक प्रशासन अहवाल, जिल्हा परिषद, नांदेड

१७. नांदेड वाघाहा शहर महानगरपालिका, शिक्षण विभागातील वार्षिक अहवाल

१८. स्वातंत्र्योत्तर काळातील नांदेड जिल्ह्यातील शाळेतील रेकॉर्डस्

१९. नियतकालिके व वर्तमानपत्रे

    १. दैनिक गोदातीर

    २. दैनिक प्रजावाणी

    ३. दैनिक मराठवाडा

    ४. दैनिक लोकसत्ता

    ५. दैनिक सामना

२०. मुलाखती

२१. प्रत्यक्ष स्थळांना भेटी

२२. www.shodhganga.com

संशोधक
अंभोरे नारायण दिगंबरराव
एम.ए., बी.एड्. एम.फिल.(इति.)
नांदेड

मार्गदर्शक
प्रा.डॉ.काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण
एम.ए., पीएच्.डी.
सहाय्यक प्राध्यापक तथा संशोधक मार्गदर्शक
इतिहास विभाग
श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय,
वसमत, जि.हिंगोली.